दैनिक
लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


(वर्ष ६५ वे अंक १७५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.०९ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर भीषण अपघात, दोघे जागीच ठार; ठाण्यातही रिक्षावर टँकर पडून २ मृत्यूमुखी

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- मुसळधार पावसामुळे गेल्या दोन दिवसांपासून केंद्रीत असलेल्या मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अपघातात झाल्याची घटना समोर आली असून अपघातात दोन जण ठार झाल्याची प्राथमिक माहिती आहे. एर्टिगा कार आणि कंटनेरची धडक बसून हा अपघात झाला, त्यात एक गंभीर जखमी झाल्याचे समजते. तर, ठाण्यातील घोडबंदर रोडवरही अपघाताची भीषण घटना घडली असून येथील अपघाततही दोघांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर टँकरचालक घटनास्थळावरुन फरार झाला आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील माडप टनेल जवळ मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या लेनवर एर्टिगा कार कंटेनरला धडकून झालेल्या अपघातात कारमधील दोन जण जागीच ठार झाले आहेत, तर एक जण गंभीर जखमी तर उर्वरित एक जण किरकोळ जखमी झाला आहे. अपघातामधील जखमींना पनवेल येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. ठाण्यातील घोडबंदर रोडवर आज दुपारी १२.४५ च्या सुमारास आनंदनगर डी-मार्ट समोर गॅस टँकर रिक्षावर पलटल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात रिक्षाचालक दशरथ पवार आणि प्रवासी मोहम्मद अमीन यांचा मृत्यू झाला, तर अमजित अन्सारी हे प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर वेदांत हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. घटनास्थळी पोलीस दाखल असून क्रेनच्या मदतीने टँकर हटवून वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. सदर टेलरचा चालक हा घटनास्थळावरून पळून गेलेला असून याबाबत गुन्हा दाखल करून पुढील तपास स्थानिक पोलीस पंचनामा करून करीत आहे.

# अमेरिका-इराण यांच्यात पुन्हा युद्धाचे संकट गडद

## आज रात्री इराणवर पुन्हा हल्ला होऊ शकतो, डोनाल्ड ट्रम्प यांची धमकी



वॉशिंग्टन दि.८ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराणमधील युद्ध तीन महिन्यांच्या कालावधीनंतर थांबलं होतं. दोन्ही देशांत युद्धविरामाची घोषणा देखील झाली होती. त्यामुळे दोन्ही देशातील तणाव हळूहळू कमी होत असतानाच अचानक अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबरोबरचा युद्धबंदीचा हंगामी करार संपुष्टात आल्याची घोषणा केली आहे.

तसेच डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा एकदा थेट युद्धाची धमकी दिल्यामुळे जगात खळबळ उडाली आहे. 'आज रात्री इराणवर पुन्हा हल्ला होऊ शकतो' अशी नवी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिली आहे. ट्रम्प यांच्या या धमकीमुळे मध्य पूर्वेत पुन्हा एकदा युद्धाचे ढग गडद झाले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिलं आहे.

अमेरिका आणि इराणमधील युद्धबंदी करार संपल्याची घोषणा केल्यानंतर काही तासांतच डोनाल्ड ट्रम्प यांनी आज रात्री अमेरिका इराणवर हल्ला करणार असल्याचे संकेत दिले आहेत. ट्रम्प यांनी म्हटलं की, "हॉर्मुज सामुद्रधुनीमध्ये इराणने जहाजांवर केलेले हल्ले, म्हणजे युद्धविरामाच्या कराराचं उलंघन आहे. इराण सध्या जे काही करत आहे, त्याबद्दल मी समाधानी नाही. हा विषय सत्तापालटाचा नाही. मात्र, इराणला अणुशस्त्र मिळावे, अशी आमची अजिबात इच्छा नाही. त्यामुळे इराण करत असलेले हे हल्ले युद्धविरामाच्या कराराचं उलंघनच आहे. इराणने असं करणं चुकीचं आहे. इराणबरोबरच्या आमच्या करारानुसार, त्यांनी त्यांचा अणुकार्यक्रम थांबवणं आवश्यक आहे, अन्यथा आम्ही स्वतः तो थांबवू", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. "हे युद्ध नाही, तर इराणला अणुशस्त्रांपासून मुक्त करण्याची ही एक मोहीम आहे. कदाचित आज रात्रीच इराणवर पुन्हा एकदा हल्ला होऊ शकतो. मी त्यांना हा केवळ एक इशारा देत आहे", अशी धमकी ट्रम्प यांनी दिली आहे.

### भारतात शेअर मार्केट क्रॅश, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चा तेलाचे दर भडकले

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराण यांच्यात शस्त्रसंधी झाल्यानं आंतरराष्ट्रीय बाजारात गेल्या काही दिवसांपासून क्रूड ऑईलच्या दरात घसरण सुरु होती. मात्र, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतची शस्त्रसंधी संपल्याचं जाहीर केलं. अमेरिकेनं इराणवर हल्ले केले, त्यानंतर इराणकडून कुवेत आणि इतर ठिकाणी हल्ले करण्यात आले. यामुळं आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑईलच्या दरात वाढ झाली. ८ जुलै म्हणजे आज ब्रेंट क्रूडचा दर ५.६ टक्क्यांनी वाढून ७८ डॉलर प्रति बॅरल झाला. तर, च्या दरात ५.८ टक्क्यांची तेजी पाहायला मिळाली, याचा दर ७४.५५ डॉलर प्रति बॅरल झाला.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या कर्मशिअल जहाजांवर इराणकडून हल्ले करण्यात आले होते. त्यानंतर अमेरिकेनं इराणच्या ८० ठिकाणांवर हल्ले केले. अमेरिकेनं इराणच्या एअर डिफेन्स सिस्टीम, किनारपट्टीवरील रडार नेटवर्क, अँटी शिप क्रूझ मिसाईल लॉंच पॅडवर हल्ले केले. अमेरिकेनं इराणच्या आयआरजीसीच्या ६० हून अधिक नौका देखील नष्ट केल्या.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तीन कर्मशिअल ऑईल टँकर जहाजांवर हल्ले झाले होते. ज्यामध्ये कतारचा झेंडा असलेल्या रेकय्यातचा समावेश होता. त्यावर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा हल्ला झाला होता. इराणनं त्या हल्ल्यांची जबाबदारी घेतली नव्हती. मात्र, अमेरिकन गुप्तचर संस्थांनी इराणला जबाबदार धरत हल्ले केले. यामुळं आखाती देशांमधील तणाव पुन्हा वाढला आहे. इराणच्या जवळ असलेले कतार आणि बरहीन हे देश सतर्क झाले आहेत. अमेरिकेनं इराणसोबतची शस्त्रसंधी संपल्याचं जाहीर केलं. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प इराणला तेल विक्रीचं दिलेला विशेष लायसन्स रद्द केलं आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात जूनमध्ये एक करार झाला होता. त्या कराराद्वारे इराणला २१ ऑगस्टपर्यंत तेल विक्रीची परवानगी देण्यात आली होती. अमेरिकन ट्रेझरी विभागाकडून इराणला देण्यात आलेली तेल विक्रीची सूट रद्द करण्यात आल्याचं म्हटलं.

# कर्जमाफीसंदर्भातील बैठक ऐनवेळी रद्द; रोहित पवारांचा सरकारवर हल्लाबोल

## ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय झाला; तिव्र आंदोलन करण्याचा इशारा



मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना ही प्रत्यक्षात कर्जमाफी नसून कर्जवसुली योजना असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार)चे आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शेतकरी कर्जमाफीसंदर्भातील समितीचे प्रमुख प्रवीणसिंह परदेशी यांच्यासोबत होणारी बैठक ऐनवेळी रद्द करण्यात आल्याने सरकार शेतकऱ्यांना न्याय देण्यास इच्छुक नसल्याचा आरोपही त्यांनी केला. या कथित अन्यायाविरोधात राज्यभर मोठे आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. रोहित पवार यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत सरकारच्या कर्जमाफी धोरणावर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या मते, सरकारने जाहीर केलेल्या योजनेतील अटी इतक्या कठोर आहेत की, राज्यातील सुमारे ७० टक्के म्हणजेच जवळपास ३६ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार नाही.

रोहित पवार म्हणाले की, २०१९ मध्ये ज्या शेतकऱ्यांनी कर्जमाफीचा लाभ घेतला, त्यांना केवळ ५० हजार रुपयांची मर्यादित मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, त्यांना किमान दोन लाख रुपयांपर्यंत मदत मिळावी, अशी आमची मागणी आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठीही २०२५-२६ आणि २०२६-२७ या कालावधीसंदर्भातील अटी घालण्यात आल्याने त्यांना लाभ मिळण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रश्नावर दोन वेळा आंदोलन करण्यात आल्याचे सांगत रोहित पवार म्हणाले की, पहिल्या आंदोलनानंतर मंत्री गिरीश महाजन यांनी सरकारसोबत चर्चा घडवून आणण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे पुन्हा आंदोलन झाले. त्या आंदोलनात राजू शेट्टी, अजित नवले, अनेक आमदार आणि विविध पक्षांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सरकारचे आणि आमचे आकडे वेगळे असल्याचे निदर्शनास आणून दिले. आम्ही आकडेवारीसह ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होणार असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर मुख्यमंत्री यांनी समितीचे प्रमुख प्रवीणसिंह परदेशी यांच्यासोबत चर्चा करण्यास सांगितल्याचा दावा त्यांनी केला.

*अयोध्या राम मंदिर दानपेटी चोरी प्रकरण*

## एसआयटीच्या तपासात मुख्य आरोपी अविनाश शुक्लाच 'मास्टरमाईंड'

अयोध्या दि.८ (वृत्तसंस्था)- अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिरातील दानपेटीत भाविकांनी अर्पण केलेल्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या रॅकेटचा उत्तर प्रदेश सरकारच्या विशेष तपास पथकाने पर्दाफाश केला आहे. या संपूर्ण चोरी प्रकरणाचा मास्टरमाईंड म्हणजेच मुख्य आरोपी अविनाश शुक्ला असल्याचे एसआयटीच्या प्राथमिक अहवालातून समोर आले आहे.

मंदिरात येणाऱ्या दानाची मोजणी करण्यासाठीच ३० वर्षीय अविनाश शुक्लाची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, त्याने 'कुंपणानेच शेत खाण्याचा' प्रकार केला. अवघ्या ४० दिवसांत त्याने सुमारे ७० वेळा दानपेटीतील पैशांवर डल्ला मारल्याचा संशय आहे. तीन सदस्यीय एसआयटीने आपला ९ पानांचा प्राथमिक अहवाल उत्तर प्रदेशच्या गृह विभागाकडे सुपूर्द केला असून, यामध्ये धक्कादायक खुलासे करण्यात आले आहेत. मंदिराच्या दान मोजणी कक्षातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. मोजणी सुरू असताना अविनाश शुक्ला अत्यंत हुशारीने नोटांचे बंडल आणि सुट्टे पैसे लपवत असल्याचे कॅमेऱ्यात कैद झाले आहे. या तपासात केवळ सीसीटीव्ही फुटेजच नाही, तर बँक खात्यांचे तपशील, साक्षीदारांचे जबाब आणि आरोपीकडून जप्त करण्यात आलेली रोकड या भक्कम पुराव्यांच्या आधारे अविनाश शुक्ला हाच या चोरीचा मुख्य केंद्रबिंदू असल्याचे सिद्ध झाले आहे.

## मुस्लिम पर्सनल लॉ कायद्यांपेक्षा मोठा नाही; बालविवाह आणि पोक्सो संदर्भात अलाहाबाद उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- देशातील कायद्याच्या चौकटीत धार्मिक कायद्यांचे स्थान काय? यावर अलाहाबाद उच्च न्यायालयाने एक अत्यंत मोठा आणि दिशादर्शक निकाल दिला आहे. मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) मधील विवाहाच्या नियमांपेक्षा देशातील बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि पोक्सो कायदा हा सर्वोच्च असेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. जर कोणी १८ वर्षांखालील अल्पवयीन मुलीशी विवाह किंवा शारीरिक संबंध ठेवल्यास, त्याला मुस्लिम पर्सनल लॉ अंतर्गत कोणतीही सूट मिळणार नाही आणि त्याच्यावर पोक्सो कायद्यांतर्गत थेट कारवाई होणार, असे न्यायालयाने म्हटले आहे.

न्यायमूर्ती जे. जे. मुनीर आणि न्यायमूर्ती अचल सचदेव यांच्या खंडपीठाने हा महत्त्वाचा निकाल दिला आहे. न्यायालयाचे हे निरीक्षण सार्वजनिक आरोग्य, बालकांचे हक्क आणि राष्ट्रीय धोरणाच्या दृष्टीने अत्यंत क्रांतिकारी मानले जात आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी उत्तर प्रदेशातील बुलंदशहर जिल्ह्याशी संबंधित आहे. या वर्षी फेब्रुवारी महिन्यात तिथे एका १६ वर्षांच्या अल्पवयीन मुस्लिम मुलीचा विवाह लावून देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, चाइल्डलाईन आणि स्थानिक पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून या मुलीची बालविवाहाच्या जाळ्यातून सुटका केली. या प्रकरणी मुलीच्या नातेवाईकांसह एकूण १९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा दाखल झालेला गुन्हा रद्द करण्यासाठी आरोपींनी अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयात असा युक्तिवाद करण्यात आला की, मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) नुसार, जर एखाद्या मुलीने वयात पदार्पण केले असेल (जे सामान्यतः १५ वर्षे मानले जाते), तर ती लग्न करण्यास पूर्णपणे पात्र असते. बालविवाह प्रतिबंधक कायदा हा शरियतच्या नियमांना डावलू शकत नाही, यासाठी त्यांनी मुस्लिम पर्सनल लॉ ॲप्लिकेशन अॅक्ट, १९३७ चा हवाला दिला होता. तथापि, अलाहाबाद उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांचा हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. हा निर्णय देताना न्यायालयाने केरळ उच्च न्यायालयाच्या एका जुन्या निकालाचा (मोईदुत्ती मुसलियार विरुद्ध सब-इन्स्पेक्टर केस) महत्त्वपूर्ण संदर्भ दिला. न्यायालय म्हणाले, "देशातील विविध उच्च न्यायालयांनी या विषयावर पूर्वी वेगवेगळी मते मांडली असली, तरी आमचे मत अत्यंत स्पष्ट आहे. कोणताही वैयक्तिक कायदा बालविवाहावरील कायदेशीर बंदीला किंवा पोक्सो कायद्याच्या कडक अंमलबजावणीला कधीही कमकुवत करू शकत नाही."

## गोकुळाष्टमीच्या कार्यक्रमात होणाऱ्या अश्लील नृत्यावर बंदी घाला-डॉ.मनिषा कायंदे

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे, मद्यपान कक्ष, बारमधील अश्लील नृत्यावर प्रतिबंध घालताना पहिल्यांदा गोकुळाष्टमी सारख्या पवित्र सणासुदीला होणाऱ्या जाहीर अश्लील नृत्यावर बंदी घाला. आम्हाला अशा कार्यक्रमांना जाण्यास लाज वाटते अशी कबुली विधान परिषदेच्या आमदार मनिषा कायंदे यांनी सभागृहात दिली.

महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासंदर्भातील २०१६ च्या कायद्यात सुधारणा करणारे विधेयक विधान परिषदेत चर्चेला आले. हे विधेयक यापूर्वी विधानसभेत मंजूर झाले असून, त्यावर बोलताना विधान परिषदेच्या सदस्या चित्रा वाघ यांनी डान्सबार आणि ऑर्केस्ट्रामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि कामगार हक्कांचा प्रश्न अत्यंत तीव्रतेने उपस्थित केला.

डान्सबार असो किंवा ऑर्केस्ट्रा, तेथे काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारने स्पष्ट आणि कडक कार्यपद्धती तयार करणे आवश्यक आहे. विशेषतः गोकुळाष्टमीसारख्या धार्मिक उत्सवांमध्ये आयोजित होणाऱ्या काही कार्यक्रमांमध्ये महिलांकडून अश्लील आणि बीभत्स स्वरूपाचे नृत्य सादर केले जाते. मंचावर नेतेमंडळी आणि (पान ४ वर)

## अशैक्षणिक कामे, टीईटी अटीविरोधात शिक्षकांचे आज राज्यव्यापी आंदोलन

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- टीईटीची सक्ती, पदोन्नतीतील कथित अन्याय आणि शिक्षकांवर वाढत असलेले अशैक्षणिक कामांचे ओझे या मुद्द्यांवरून राज्यातील शिक्षक संघटना गुरुवारी राज्यव्यापी 'शाळा बंद' आंदोलन करणार आहेत. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक यांनी सामूहिक रजा घेऊन आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन विविध शिक्षक संघटनांनी केले आहे.

शिक्षण संचालकांनी १४ मे २०२६ रोजी काढलेल्या पत्रानुसार विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक पदांसाठीच्या पदोन्नती प्रक्रियेत टीईटी किंवा सीटीईटी पात्रता अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे सेवाज्येष्ठ शिक्षकांवर अन्याय होत असून हे पत्र तत्काळ रद्द करावे, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ३१ ऑगस्ट २०२८ पर्यंत पात्रता मिळवण्याची मुदत असतानाही सेवाज्येष्ठ शिक्षकांना पदोन्नतीपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. याशिवाय शिक्षकांना बीएलओ आणि विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेसारखी अशैक्षणिक कामे देणे बंद करावी, संचमान्यता धोरण मागे घ्यावे आणि पदोन्नतीतील सर्व प्रकारचे अन्याय दूर करावेत आदी मागण्यांसाठी (पान ४ वर)

## ख्रिश्चन मिशनरीच्या मालमत्तांची राज्यव्यापी तपासणी; तीन महिन्यांत अहवाल

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- इंग्रजकालीन ख्रिश्चन मिशनरी संस्थांनी राज्यात मागे सोडलेल्या मालमत्तांची राज्यव्यापी तपासणी करून त्यांच्या मालकीहक्क, अभिलेख व त्यानंतर झालेल्या व्यवहारांचा सविस्तर आढावा घेण्यात येईल. तसेच याबाबतचा अहवाल तीन महिन्यांत तयार करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. सदस्य देवयानी फरांदे यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, राज्यातील ख्रिश्चन मिशनरी संस्थांच्या मालमत्तांबाबत महसूल अभिलेख, जमाबंदी नोंदी, मालकीतील बदल तसेच त्यानंतर झालेल्या व्यवहारांची सखोल तपासणी करण्यात येणार आहे. यासाठी विभागीय आयुक्तांच्या स्तरावर महसूल, जमाबंदी, नोंदणी व मुद्रांक, पोलीस आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली यंत्रणा कार्यरत केली जाईल.

नाशिक डायोसेशन ट्रस्ट आणि नाशिक डायोसेशन कौन्सिल (पान ४ वर)

## महाराष्ट्रात व्यवहारिक मराठी अनिवार्य; महाराष्ट्र मोटार वाहन नियमात सुधारणा

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- "मराठी ही कोणाला दूर करणारी भाषा नाही, तर माणसाला माणसाशी जोडणारी भाषा आहे." या भावनेतून महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांसाठी व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४, २२, ७८ आणि ८५ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या असून, १६ ऑगस्ट २०२६ पासून या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यासंदर्भातील अधिसूचना ८ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधिमंडळात निवेदनाद्वारे दिली.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची, समाजसुधारकांची, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी विचारांची आणि समृद्ध मराठी संस्कृतीची भूमी आहे. रोजगाराच्या शोधात देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे महाराष्ट्राने नेहमीच खुले मनाने स्वागत केले आहे. मात्र, राज्यातील जनतेशी संवाद साधण्या इतपत व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे ही केवळ कायदेशीर अट नसून सामाजिक बांधिलकी देखील आहे.

हा निर्णय कोणत्याही भाषे (पान ४ वर)

## मिसिंग लिंक इंजिनिअरिंग मार्व्हलच; देवेंद्र फडणवीस सभागृहात संतापले

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- मिसिंग लिंकवर दरड कोसळल्यानंतर काही लोकांनी सरकारवर अवाजवी टीका केली. एक कोटी खोटारडे लोक मेल्यानंतर हे लोक पैदा झाले असतील. त्यांना खोटं बोलायला लाजही वाटत नाही. मात्र, या सगळ्यांच्या नाकावर टिच्चून सरकारने १८ तासांत मिसिंग लिंकवरील वाहतूक पूर्ववत केली. भविष्यात मिसिंग लिंकवरुन आमच्यावर टीका करणारे शिल्लक राहणार नाहीत. पण १० वर्षांनी मिसिंग लिंक असेल, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंचं नाव असेल. मला बदनाम करा पण महाराष्ट्राला बदनाम करु नका, अशा आक्रमक भाषेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीकाकारांना प्रत्युत्तर दिले. ते बुधवारी विधानसभेत बोलत होते.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी मिसिंग (पान ४ वर)

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर न्यायालयीन लढा अधिक ताकदीने लढण्याचा निर्धार




मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी विधानभवनात उच्चाधिकार समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष तथा खासदार शरद पवार, खासदार नारायण राणे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सीमा भागातील लोकप्रतिनिधी आणि सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. विशेष म्हणजे, अधिवेशन काळात तब्बल ३० वर्षांनंतर शरद पवार विधानभवनात दाखल झाले.

शरद पवार बैठकीसाठी येणार असल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे सर्व आमदार विधानभवनात त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही शरद पवार यांचे स्वागत केले. विधानभवन परिसरात त्यांच्या आगमनाची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्र-कर्नाटक (पान ४ वर)

## विजेचा धक्का लागून एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

सातारा दि.८ (प्रतिनिधी)- सातारा जिल्ह्यात अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना घडली आहे. फलटण तालुक्यातील खामगाव येथे विजेचा तीव्र धक्का लागून एकाच कुटुंबातील चार जणांचा जागीच मृत्यू झाला. हे सर्व मृत व्यक्ती पारधी समाजातील एकाच कुटुंबातील असून, या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण सातारा जिल्ह्यात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. घरासमोरील विद्युत केबलच्या उघड्या तारेला एकाचा स्पर्श झाला. एकमेकांना वाचवण्याच्या नादात कुटुंबातील इतर सदस्य पुढे सरसावले, पण काळानं त्यांच्यावरही घाला घातला. एकमेकांना वाचवण्याच्या प्रयत्नात या चारही जणांचा जागीच मृत्यू झाला.

मृतांमध्ये (पान ४ वर)

# विद्यार्थ्यांसाठी शेतीविषयक अभ्यास दौरे असावेत

देशातील शेतीविषयक अभ्यास करताना विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन शेतीकामाचा अनुभव घेणे फार महत्त्वाचे असते. आजही आपल्या देशात शेती हेच उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असल्याने मानवी जीवनात शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तेव्हा पुस्तकात शेतीच्या धड्यांचा अभ्यास करीत असताना शेतात जाऊन काम केल्याने विद्यार्थ्यांना शेतीविषयक अधिक माहिती मिळते. यामध्ये नांगरणी, तरवा पेरणे, तरवा काढणे, रोव पेरणे, लावणी लावणे, कापणी करणे व झोडणे इत्यादी कामे करावी लागतात. तेव्हा सध्या पावसाळा सुरू आहे.

शेतीची कामेसुद्धा सुरू असून कोकणात भात लावणी चालू आहे. तशी वेगवेगळ्या प्रकारची शेतीसुद्धा केली जाते. अशावेळी विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्ष शेतीकामाचा अनुभव घेण्यासाठी अभ्यास दौरे शैक्षणिक संस्थांनी आयोजित करावेत. जेणेकरून त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडून शेतीक्षेत्राची अधिक गोडी निर्माण होण्याला मदत होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांचे शेतीविषयक अभ्यास दौरे आयोजित करण्यात यावेत. शाळेबरोबर शेतातसुद्धा शेती हंगामात शाळा भरवली पाहिजे.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. जरी पुस्तकातून शेतीचे धडे शिकविले गेले तरी प्रत्यक्षात शेती कशी केली जाते हे जवळून पाहता यावे तसेच प्रत्यक्ष शेतात काम करून एक नवीन अनुभव विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी विद्यार्थ्यांचे शेतीविषयक अभ्यास दौरे आयोजित करण्यात यावेत. म्हणजे प्रत्यक्ष काम केल्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळून त्यांना त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडू शकते. तेव्हा सध्या पावसाळी शेतीची कामे सुरू आहेत. पाऊससुद्धा बऱ्यापैकी शेती योग्य लागत आहे. यात चिखलात नांगरणी, पेरणी, लावणी यांचा प्रत्यक्षात अनुभव मिळू शकतो.

महत्त्वाची बाब म्हणजे, शेतात काम केल्याचे विशेष समाधान मिळेल. याचा चांगला परिणाम शेतात प्रत्यक्ष काम केल्याने शेतीविषयक कामाची त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडणार आहे. शेतीच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी करण्यापेक्षा वाफ्यात जाऊन चिखलात लावणी लावल्यामुळे त्याचा अनुभव संदर्भ पुस्तकाच्या पलीकडचा असतो. सध्या भात लावणीची कामे कोकणात जोरात चालू आहेत. तेव्हा विद्यार्थ्यांना शेतीविषयक लागवडीची माहिती घेण्यासाठी शेती हंगाम ात विद्यार्थ्यांचे अभ्यास दौरे आयोजित करायला हवेत. यातून विद्यार्थ्यांना शेतीची आवड निर्माण होण्याला मदत होईल. ही समाधानाची बाब आहे.

आजही शेतकरी ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने शेती करतात. जर विद्यार्थ्यांना अशा अभ्यास दौऱ्यातून शेतीचे ज्ञान मिळाल्यास त्याचा फायदा ते आपल्या घरच्या शेतीत उत्तमप्रकारे बदल करून अधिक उत्पादन घेऊ शकतात. हे फक्त आपल्याला अनुभवातून मिळते. तसेच विद्यार्थ्यांना शेतकरीदादा यांचे शेतीविषयक मौलिक विचार व मार्गदर्शन मिळू शकतात. महत्त्वाची बाब म्हणजे, सध्या पावसाळी शेती हंगाम सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना पुस्तकातून शेतीचे धडे शिकविताना आता प्रत्यक्ष अनुभव येण्यासाठी अभ्यास दौरे करावेत. म्हणजे भाताची लावणी कशी करण्यात येते याची विद्यार्थ्यांना कल्पना येते. त्या आधी तरवा कसा काढायचा हे प्रत्यक्षात अनुभवता येते. लावणीसाठी चिखल कसा तयार केला जातो याचे वाफ्यातील चिखलाचे निरीक्षण करून पाहू शकतो. त्यासाठी नांगरणी कशी केली जाते, याची माहिती मिळते. सध्या बऱ्याच ठिकाणी नांगरणी ट्रॅक्टरने केली जात आहे. सध्या क्वचित बैलांचे जोत बांधून नांगरणी केल्याचे पाहायला मिळते. बैलांच्या साहायाने केलेली नांगरणी अधिक गलगलीत होत असते. तशी ट्रॅक्टरने होत नाही. याचा चांगला परिणाम चिखलात लावणी लावताना बोटाला सहसा इजा होत नाही. त्यामुळे अधिक उत्साहाने भाताची लावणी लावली जाते. शेती हंगामातील अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्षात वाफ्यातील चिखलात लावणी लावल्याचा अनुभव येईल. बऱ्याच वेळा शेतीची कामे पूर्ण झालेली असतात. त्यावेळी शेतीच्या बांधावर जाऊन शेतीचा अभ्यास केला जातो. तेव्हा असे न करता आता पावसाळा ऋतू चालू आहे. यावर्षी पावसाळा ऋतू चालू होण्यापूर्वी वरुणराजाचे जोरात आगमन झाले होते.

आतासुद्धा समाधानकारक पाऊस लागत आहे. त्यामुळे कोकणात नांगरणी करून भात पेरण्यात येऊन आता तरवा काढून चिखल करून लावणी लावण्यात येत आहे. अशावेळी शाळेतील मुलांना प्रत्यक्ष लावणी कशी लावली जाते याचा अनुभव येण्यासाठी शेतीला अनुसरून धडे असतील अशा मुलांचे अभ्यास दौरे आता काढावेत. मुलांना चिखलात प्रत्यक्ष भाताची लावणी लावण्याचा अनुभव घेता येईल. हा शेतीमध्ये काम केल्याचा अनुभव त्यांना इतर काम करताना प्रेरणा देणारा ठरणार आहे. हल्ली ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील मुलांना लावणीचा अनुभव येण्यासाठी शिक्षक शेतात नेऊन प्रत्यक्ष लावणी कशी लावली जाते याची माहिती व प्रात्यक्षिक दाखवून नंतर त्यांना लावणी लावायला सांगतात. तशी ग्रामीण भागातील मुले शेती कामात हुशार असतात. आई-वडिलांसोबत शेतात काम करीत असतात. त्यामुळे त्यांना दांडगा अनुभव शेती कामाचा असतो. बरीच कामे ग्रामीण भागातील मुले शाळा सांभाळून करतात. त्यांना अप्रत्यक्षपणे शेतीकामाचा अनुभव असतो. तेव्हा विद्यार्थ्यांना शाळेत शेतीविषयक धड्यांचा अभ्यास करताना प्रत्यक्षात शेतावर जाऊन शेतीविषयक अभ्यास करण्यासाठी अभ्यास दौऱ्यांची गरज आहे.

# एसआयआर : मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न

मतदानाचा दिवस उजाडतो. उत्साहाने एक नागरिक मतदान केंद्रावर पोहोचतो. रांगेत उभा राहतो. त्याची वेळ येते. मात्र मतदार यादी तपासल्यानंतर त्याला सांगितले जाते आपले नाव यादीत नाही. काही क्षणांसाठी तो स्तब्ध होतो. मतदानाचा अधिकार असतानाही तो त्या दिवशी तो वापरू शकत नाही. त्या क्षणी त्याला जाणवते की लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार केवळ मतदानाच्या दिवशी मिळत नाही; तो त्याही आधी मतदार यादीत आपल्या नावाच्या अचूक नोंदीपासून सुरू होतो.

ही जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी, यासाठी भारत निवडणूक आयोगा मार्फत वेळोवेळी यादी अद्यावत करण्यात येते. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर). ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय उपक्रम नाही; ती प्रत्येक पात्र नागरिकाच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न आहे.




**मतदार यादी म्हणजे लोकशाहीचा पाया**

घराचा मजबूत पाया दिसत नाही, पण संपूर्ण घर त्यावर उभे असते. मतदार यादीचेही तसेच आहे. मतदान केंद्रावरील मतपेटी, निवडणुकीची प्रक्रिया किंवा निकाल यापूर्वी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते. मतदार यादीची अचूकता.

मतदार यादी ही केवळ नावांची यादी नसते. ती देशातील प्रत्येक पात्र नागरिकाच्या समान अधिकाराची अधिकृत नोंद असते. या यादीत नाव अचूक असणे म्हणजे मतदानाचा अधिकार सुरक्षित असणे. नाव, पत्ता किंवा इतर माहिती योग्य असल्यामुळे भविष्यातील मतदानाच्या दिवशी कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे मतदार यादीतील प्रत्येक नोंद ही लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ करणारी ठरते.

**एसआयआर का आवश्यक आहे?**

दरवर्षी नियमित पुनरीक्षणाची प्रक्रिया होत असते. त्यामध्ये नवीन मतदारांची नोंद, माहितीतील बदल किंवा दुरुस्ती केली जाते. मात्र काही वेळा अधिक व्यापक आणि सखोल पडताळणीची आवश्यकता निर्माण होते. अशा वेळी एसआयआर राबविण्यात येते.

या विशेष पुनरीक्षणाचा उद्देश प्रत्येक पात्र म तदाराची नोंद शक्य तितकी अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह ठेवणे हा असतो. कालांतराने स्थलांतर, पत्त्यातील बदल, नव्याने पात्र झालेले मतदार किंवा इतर कारणांमुळे माहितीमध्ये बदल होऊ शकतात. एसआयआर या सर्व बाबींकडे अधिक बारकाईने पाहते. त्यामुळे मतदार यादी अधिक सक्षम, पारदर्शक आणि वास्तवाशी सुसंगत बनते. ही प्रक्रिया भविष्यातील निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग अधिक सहज आणि निर्विघ्न व्हावा, यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**घरभेट देणारा अधिकारीः विश्वास जपणारा दुवा –** या प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) किंवा निवडणूक कर्मचारी नागरिकांच्या भेटी घेतात. अनेकदा ही भेट केवळ कागदपत्रांची पडताळणी वाटू शकते. पण प्रत्यक्षात ती त्यापेक्षा कितीतरी मोठी असते.

घराच्या दाराशी आलेला बीएलओ हा केवळ माहिती नोंदवणारा अधिकारी नसतो; तो प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहावा, यासाठी काम करणारा महत्त्वाचा दुवा असतो. त्याच्या नोंदींमुळे मतदार यादी अधिक अचूक बनते आणि भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक तयारी पूर्ण होते.

ही प्रक्रिया नागरिक आणि निवडणूक व्यवस्थापन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करते. कारण लोकशाही मजबूत होण्यासाठी प्रशासन आणि नागरिक यांचा परस्पर संवाद तितकाच आवश्यक असतो. ही प्रक्रिया प्रशासनासाठी नव्हेः प्रत्येक मतदारासाठी आहे

लोकशाहीमध्ये प्रत्येक मत सम ान मूल्य घेऊन येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आवाज त्यातून व्यक्त होतो. त्यामुळे मतदार यादीतील स्वतःची माहिती अचूक राहणे म्हणजे आपल्या त्या आवाजाची खात्री करून घेणे होय. एसआयआर ही कोणत्याही एका विभागासाठी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी राबवली जाणारी प्रक्रिया नाही. तिचा सर्वाधिक लाभ नागरिकालाच मिळतो. कारण योग्य आणि अद्ययावत मतदार यादी म्हणजे भविष्यात मतदानाच्या दिवशी आत्म विश्वासाने मतदान करता येण्याची खात्री. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे केवळ एक औपचारिकता पूर्ण करणे नव्हे; तर स्वतःच्या घटनात्मक अधिकाराचे जतन करण्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे होय. लोकशाहीतील आपली उपस्थिती नोंदविण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे.

**उद्याच्या मतदानाचा विश्वास आजच्या सहभागातून –** लोकशाही ही केवळ निवडणुकीच्या दिवशी जिवंत होत नाही. ती प्रत्येक वेळी बळकट होते, जेव्हा प्रत्येक पात्र नागरिकाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया मनापासून पूर्ण केली जाते.

एसआयआर ही अशीच एक विश्वास निर्माण करणारी प्रक्रिया आहे. आज काही मिनिटे देऊन केलेली माहितीची पडताळणी उद्या मतदानाच्या दिवशी निश्चिंतपणे मतदान करण्याचा आत्मविश्वास देते. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ नोंदी अद्ययावत करण्यापुरती मर्यादित राहत नाही; ती नागरिक आणि लोकशाही यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा पूल बनते. प्रत्येक मत महत्त्वाचे असते, कारण त्यामागे एका नागरिकाची ओळख, त्याचा अधिकार आणि देशाच्या लोकशाहीवरील विश्वास दडलेला असतो. म्हणूनच एसआयआर ही ङ्गकोणासाठी तरीङ्ग नसून आपल्या प्रत्येकासाठी आहे. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे आपल्या मतदानाच्या अधिकाराला अधिक सुरक्षित, सक्षम आणि भविष्यासाठी निश्चित करण्याचा सकारात्मक निर्णय. आणि म्हणूनच, ही प्रक्रिया माझ्यासाठी आहेः आणि त्यात सहभागी होणे हे माझ्या लोकशाही प्रवासाचे स्वाभाविक पाऊल आहे. महाराष्ट्रात भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत एसआयआर अंतर्गत घरभेटींद्वारे गणना प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या काळात बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घराला भेट देऊन गणना फॉर्म उपलब्ध करून देतात, आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करतात आणि मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी माहिती संकलित करतात. त्यानंतर प्राप्त माहितीची छाननी, दावे व हरकतींची प्रक्रिया पूर्ण करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अचूक, सुरक्षित आणि निर्विघ्न राहावा, हा आहे.

– सचिन अडसूळ,
जिल्हा माहिती अधिकारी,
कोल्हापूर

# ट्रॅकपासून रस्त्यापर्यंत, ७० लाख प्रवासांचा टप्पा: टीव्हीएस अपाचेची ‘तू रेस लगा’ मोहीम

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) – दुचाकी आणि तीनचाकी विभागातील जागतिक आघाडीची कंपनी आणि टीव्हीएस वेणूचा भाग असलेल्या टीव्हीएस मोटर कंपनीने, जगभरात ७० लाख ग्राहकांचा टप्पा आज साजरा केला. तसेच 'तू रेस लगा' या आपल्या ब्रँडच्या नवीन मोहिमेच्या जाहिरातीचे अनावरण करत, टीव्हीएस अपाचे ब्रँडने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.

२००५ मध्ये स्थापनेपासून, प्रत्येक टीव्हीएस अपाचे ट्रॅक टू रोड या तत्त्वज्ञानावर तयार करण्यात आली आहे, जी टीव्हीएस रेसिंगच्या चॅम्पियनशिप-विजेत्या कौशल्याला दैनंदिन कामगिरीमध्ये रूपांतरित करते. चार दशकांहून अधिक काळाच्या रेसिंग परंपरेचा आधार असलेली टीव्हीएस अपाचे, रेसचे तंत्रज्ञान, अचूक अभियांत्रिकी आणि चालक-केंद्रित नावीन्य यांचा मिलाफ साधून प्रत्येक प्रवासात एक अतुलनीय कामगिरीचा अनुभव देते.

केवळ मोटारसायकलींपलीकडे जाऊन, टीव्हीएस अपाचेने देशातील सर्वात उत्साही रायडिंग समुदाय निर्माण केला आहे. ५,००,००० हून अधिक नोंदणीकृत सदस्य असलेला हा समुदाय कामगिरी, साहस आणि परस्पर सौहार्दाच्या सामाईक आवडीमुळे एकत्र आला आहे. राईड्स, ट्रॅकवरील अनुभव आणि ब्रँडशी साधलेला थेट संवाद यातून, टीव्हीएस अपाचे केवळ मालकीहक्काच्या पलीकडे जाऊन अर्थपूर्ण नातेसंबंध निर्माण करत आहे.

गेल्या काही वर्षात, टीव्हीएस अपाचेने या श्रेणीतील अनेक नावीन्यपूर्ण गोष्टी सातत्याने सर्वप्रथम सादर केल्या आहेत –

रोटो-पेटल डिस्क ब्रेक्स, फ्युएल इंजेक्शन, ड्युअल-चॅनेल अइड, विविध राईड मोड्स, टीव्हीएस स्मार्ट कनेक्टख़, ग्लाईड थ्रू टेक्नॉलॉजी




(GTT), बिल्ट-टू-ऑर्डर प्लॅटफॉर्मद्वारे फॅक्टरी कस्टमायझेशन, की-लेस राईड सिस्टम आणि ट्रॅक्शन कंट्रोल तसेच डायनॅमिक स्टॅबिलिटी सिस्टम्ससारखी प्रगत रायडरसाठी योग्य वैशिष्ट्ये. ९० देशांमधील ७० लाखांहून (७ दशलक्ष) अधिक ग्राहकांच्या समुदायासह, टीव्हीएस अपाचे जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या परफॉर्मन्स मोटारसायकल ब्रँड्सपैकी एक म्हणून आपली ओळख टिकवून आहे.

जगभरातील ७० लाख ग्राहकांचा टप्पा साजरा करण्यासाठी आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, ब्रँडने आपली नवीन जाहिरात, ‘तू रेस लगा’ सादर केली आहे. प्रख्यात भारतीय चित्रपट निर्माते आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते श्री. राम माधवानी यांनी ती दिग्दर्शित केली आहे. टीव्हीएस अपाचेच्या ‘ट्रॅक टू रोड’ या तत्त्वज्ञानावर आधारित, ही जाहिरात रेसट्रॅकवरील रोमांच, नियंत्रण आणि थरार ही ब्रँडची ओळख दर्शवते. ग्राहकांचे आभार मानताना, टीव्हीएस मोटर कंपनीचे इंडिया टू-व्हीलर बिझनेसचे अध्यक्ष श्री. गौरव गुप्ता म्हणाले, ‘दोन दशकांपासून दाखवलेला विश्वास आणि पॅशन याबद्दल आम्ही ७० लाख टीव्हीएस अपाचे रायडर्सचे आभार मानतो. रेसिंगमधील सुरुवात ते जागतिक स्तरावरील परफॉर्मन्स ब्रँड बनण्यापर्यंतचा हा टप्पा टीव्हीएस मोटरच्या संपूर्ण परिसंस्थेची (इकोसिस्टमची) निष्ठा दर्शवतो. अर्थपूर्ण नावीन्य, जागतिक विस्तार आणि रायडर्सचा मजबूत समुदाय यांच्या माध्यमातून आम्ही परफॉर्मन्स म ोटरसायकलिंगच्या क्षेत्रातील नवनवीन टप्पे गाठणे सुरूच ठेवू.' या महत्त्वपूर्ण टप्प्यावर भाष्य करताना, टीव्हीएस मोटर कंपनीचे हेड बिझनेस – प्रीमियम, श्री. विमल सुंबली म्हणाले, 'रेसट्रॅकवरील रोमांच, नियंत्रण आणि रेसिंगमधील उत्कृष्ट क्षमता सामान्य रायडर्सपर्यंत पोहोचवण्याच्या एका विशिष्ट उद्देशाने वीस वर्षांपूर्वी, ट्रॅक टू रोड (Track to Road) या तत्त्वज्ञानाद्वारे टीव्हीएस अपाचेची निर्मिती झाली. आज, जागतिक स्तरावर ७० लाख (७ दशलक्ष) ग्राहकांचा टप्पा गाठत असताना, जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रीमियम मोटरसायकल ब्रँड्सपैकी एक म्हणून झालेला टीव्हीएस अपाचेचा विकास आणि रायडिंगच्या समान आवडीने एकत्र आलेला एक समृद्ध समुदाय पाहून आम्हाला अभिमान वाटतो. 'तू रेस लगा' या मोहिमेचे उद्घाटन म्हणजे या प्रवासाला आणि अशा प्रत्येक रायडरला दिलेली मानवंदना आहे, जो स्वतःच्या मर्यादांना आव्हान देतो, प्रगतीचा स्वीकार करतो आणि रेसिंगची ती जिद्द आपल्या दैनंदिन जीवनातही जपतो. भविष्याकडे पाहताना, सततची नवनिर्मिती, रेसिंगमधील प्रगत तंत्रज्ञान आणि जगभरातील रायडर्सना प्रेरणा देणारे अनुभव यांच्या माध्यमातून मोटरसायकलिंगचे स्वरूप नव्याने घडवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.'

टीव्हीएस अपाचे रेंज- टीव्हीएस अपाचे स्ट्रीट/नेकेड, सुपरस्पोर्ट आणि ॲडव्हेंचर रॅली टूरर मोटरसायकल सेगमेंटमध्ये उपलब्ध असून, यामध्ये १६० सीसी ते ३१० सीसी पर्यंतची इंजिन क्षमता आहे:

- स्ट्रीट/नेकेड: RTR 160, RTR 160 4V, RTR 180, RTR 200 4V, RTR 310.
- सुपरस्पोर्ट: ठठ ३१०
- ॲडव्हेंचर रॅली टूरर: ठढद

**जाहिरात येथे पाहा**

टीव्हीएस अपाचे ‘तू रेस लगा’ आता येथे पाहू शकता : ●यूट्युब : https://youtu.be/i5VJ6TsuOuQ;

# राज्यातील भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी तुकाराम मुंढे यांना राज्याच्या प्रशासकीय अधिकारी (मुख्य सचिव)पदावर नियुक्ती करण्यात यावी

**राज्यात** अनेक खात्यांमध्ये किंवा विभागांमध्ये भ्रष्टाचाराची दुर्गंधी दिवसेंदिवस पसरत आहे.या अनुषंगाने यावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.अन्यथा भ्रष्टाचार राज्याला पोखरून टाकेल.राज्यासह देशाला कल्पना आहे की, माननीय श्री तुकाराम मुंढेनी ज्या-ज्या विभागांचा पदभार सांभाळला किंवा स्विकारला अशा सर्वच विभागांच्या संबंधित नागरिकांनी श्री तुकाराम मुंढे यांचे कौतुक करून स्वागत केले आहे.कारण त्यांची कार्यपद्धती व कार्य करण्याची शैलीमुळे संबंधित विभाग घाबरायला लागला आहे आणि याचा सरळ फायदा राज्याच्या १४ कोटी जनतेला होत आहे,ही अत्यंत लाख मोलाची कामगिरी आज आपल्या अधिकाराचा वापर करून मुंढे करीत आहे.त्यामुळे सन्माननीय तुकाराम मुंढे यांना माझा सलाम.आपणा सर्वांनाच ग्यात असेल की, तुकाराम मुंढे यांनी आपल्या अधिकाराचे तंतोतंत पालन करून कोणाच्याही दबावाखाली न येता कठोर कारवाईचा पवित्रा घेतला.परंतु कठोर कारवाईचे सुत्र राजकीय पुढाऱ्यांना पचले नाही आणि सरकारने त्यांची २५ वेळा वेगवेगळ्या विभागात बदली केल्याचे आपण पहिले.परंतु आता बदली तंत्र बदलवून केंद्र सरकारने त्यांची जर राज्याच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती केली तर सर्वच अडचणी आपोआप दूर होतील व महाराष्ट्र भ्रष्टाचार मुक्त होऊन सुजलाम सुफलाम होण्यास मोठी मदत होईल.असे सांगितले जाते की, महाराष्ट्र राज्याचा कारभार पहाण्यासाठी राज्यात प्रत्येक विभागात महत्वपूर्ण प्रशासकीय अधिकारी आहेत व त्यांचे संपूर्ण नियंत्रण त्यांच्या विभागांवर असते.अशा पध्दतीचे राज्यात ३५० पेक्षा जास्त आयएएस अधिकारी आहेत आणि त्यांनी केलेली कोणतीही कायदेशीर कारवाई म्हणजे लक्ष्मण रेषा असते यात कोणत्याही प्रकारची हयगय केल्या जात नाही व कोणाचाही हस्तक्षेप ग्राह्य धरल्या जात नाही.परंतु दुर्दैवाने सांगावे लागते की,यात फक्त एकच अधिकारी तुकाराम मुंढे एक्शनमोडमध्ये असल्याचे दिसून येते आणि ते ज्या-ज्या विभागात गेले त्या-त्या संपूर्ण विभागाची पोलखोल करून आणि योग्य कारवाई करून संपूर्ण जनतेपुढे ठेवली आहे त्यामुळेच आज तुकाराम मुंढे एक प्रचलित व्यक्तीमत्व दिसून येते.त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, राज्याच्या चांगल्या कामासाठी फक्त एकच अधिकारी लढतो की काय असे चित्र राज्यापुढे दिसत आहे.राज्याच्या १४ कोटी जनतेला कल्पना आहे की, राज्यात वेगवेगळ्या विभागात वेगवेगळ्या पध्दतीचा भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात उफाळला आहे आणि त्यावर नियंत्रण फक्त मुख्य प्रशासकीय अधिकारी (आयुक्त) (आयएएस) अधिकारीच ठेवू शकतो. कारण त्यांच्या कारवाईत कोणीही हस्तक्षेप करूनच शकत नाही.प्रशासकिय अधिकारी हा राजकीय पुढारी, आमदार-खासदार, संबंधित विभागाचे मंत्री किंवा अधिकारी यांच्या चुकीच्या धोरणाच्या विरूद्ध सरळ कारवाई करण्याचा पुर्ण अधिकार असतो आणि तेच काम श्री तुकाराम मुंढे इमानदारीने आणि कसोटीने करीत आहे.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, राज्याच्या संबंधित विभागाच्या प्रशासकीय अधिकारी पदावर असणारे आय एएस अधिकारी ३५० पेक्षा जास्त आहेत त्यांनी तुकाराम मुंढे यांच्या कारवाईपासुन काहीतरी शिकवण घेतली पाहिजे किंवा त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करायला पाहिजे. कारण राज्यातील सर्वच विभाग दुधासारखे शुद्ध नाहीत ही बाब हमखासपणे सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, राज्याचा एकच अधिकारी ज्या-ज्या विभागात जातो त्या त्या ठिकाणी त्याला सर्वत्र काळाबाजार दिसतो आणि बाकिच्या अधिकाऱ्यांना काहीच का दिसत नाही?याचाच अर्थ असा की, पाणी कुठेतरी मुरत असावे. त्यामुळे महामहीम राष्ट्रपती, पंतप्रधान व केंद्र सरकारला विनंती आहे की, तुकाराम मुंढे यांची जनहितार्थ धडक कारवाई लक्षात घेता राज्याच्या मुख्य प्रशासकीय अधिकारपदी (मुख्य सचिवपदी) निवड करण्यात यावी.कारण तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेली धडक कारवाई वरून लक्षात येते की, राज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार उफाळला आहे आणि यांवर नियंत्रण आणण्यासाठी सन्माननीय तुकाराम मुंढे यांची राज्याच्या प्रशासकीय अधिकारी(मुख्य सचिव)पदावर नियुक्ती करण्यात यावी. यामुळे सर्वच विभागांवर तुकाराम मुंढे यांची करडी नजर राहील व राज्याच्या १४ कोटी जनतेला भ्रष्टाचारापासुन मुक्ती मिळेल व मोकळा श्वास घेण्याचा अधिकार प्राप्त होईल. कारण ज्या-ज्या क्षेत्रात किंवा विभागात तुकाराम मुंढे यांनी पाय रोवले त्या-त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार दिसून आला आणि यावर कठोर पाऊल उचलून कारवाई फत्ते करून जनतेला आश्वस्त केले आणि आताही कठोर कारवाई सुरूच आहे.जय हिंद!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# पिंपळे सौदागर, रहाटणीतील पूरग्रस्तांना उन्नतीचा मदतीचा हात

पुणे, दि. ८ (प्रतिनिधी) – गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पवना नदीला आलेल्या पुराने पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले होते. पूराचा धोका वाढल्याने अनेक कुटुंबांना सुरक्षितस्थळी हलविले. रहाटणी आणि पिंपळे सौदागरमधील महापालिकेच्या शाळेत तात्पुरत्या स्वरुपात हलवलेल्या पूरग्रस्त नागरिकांना उन्नति सोशल फाऊंडेशनच्या वतीने ब्लँकेट, बिस्किटांचे पुडे, पिण्याचे पाणी, नाश्ट्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे आणि संस्थापक संजय भिसे यांनी मदत केंद्रांना भेट देऊन पूरग्रस्त नागरिकांची विचारपूस केली.



त्यांच्या अडचणी जाणून घेत प्रशासनाच्या मदतकार्यातही सहकार्य केले. फाउंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी दिवसभर मदतकार्य करून नागरिकांना दिलासा दिला.

# परिवर्तनवादी साहित्य चळवळीचा ऐतिहासिक टप्पा; राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या नियोजनाला प्रारंभ

## ‘पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन-२०२६’साठी १२ जुलै रोजी पहिली नियोजन बैठक; राज्यभरातील साहित्यिक, विचारवंत व सामाजिक कार्यकर्त्यांना सहभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता आणि प्रबोधनाच्या मूल्यांना साहित्याच्या माध्यमातून अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने 'पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन-२०२६' आयोजित करण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी संमेलनाच्या आयोजनाच्या अनुषंगाने पहिली नियोजन बैठक रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता सुभेदारी गेस्ट हाऊस, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

परिवर्तनवादी साहित्य प्रवाह अधिक व्यापक करण्याबरोबरच नवोदित आणि ज्येष्ठ साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार, अभ्यासक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत यांना एकत्र आणून वैचारिक संवादाचे प्रभावी व्यासपीठ निर्माण करण्याचा या संमेलनामागील उद्देश आहे. संमेलनाच्या नियोजनात सर्व घटकांचा सक्रिय सहभाग राहावा, यासाठी या बैठकीत संमेलनाची रूपरेषा, विविध समित्यांची स्थापना, कार्यक्रमाचे नियोजन, स्मरणिका, प्रतिनिधी नोंदणी, आर्थिक नियोजन तसेच विविध उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

राज्यभरातील साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते, मार्गदर्शक, हितचिंतक आणि परिवर्तनवादी चळवळीतील सर्व सहप्रवाशांनी या बैठकीस उपस्थित राहून आपल्या सूचना, मार्गदर्शन आणि सहकार्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

'परिवर्तनाच्या विचारांना शब्दांची ताकद आणि कृतीची दिशा देण्यासाठी प्रत्येक परिवर्तनवादी व्यक्तीचा सहभाग महत्त्वाचा आहे. आपल्या उपस्थितीमुळे हे संमेलन अधिक व्यापक, वैचारिकदृष्ट्या समृद्ध आणि ऐतिहासिक ठरेल,' असे आवाहन निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन-२०२६ चे मुख्य संयोजक रतनकुमार साळवे यांनी केले आहे.

बैठकीचा तपशील : – दिनांक : रविवार, १२ जुलै २०२६, – वेळ : दुपारी १२.०० वाजता, – स्थळ : सुभेदारी गेस्ट हाऊस, छत्रपती संभाजीनगर.

संपर्क : ९९२३५०२३२० / ८९०८८६७७७७ / ७०३०४१०५०१ / ८८५६८५५८०५

# उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे वैजापूर, गंगापूर येथील शिबिर कार्यालये कार्यान्वित

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी)– वैजापूर येथील नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची स्थापना झाली असून त्या अंतर्गत वैजापूर व गंगापूर या दोन तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

या दोन्ही तालुक्यातील नागरिकांना अधिक सुलभ सेवा मिळावी यासाठी शिबिर कार्यालये कार्यान्वित करण्यात आली असल्याचे उपप्रादेशीक परिवहन अधिकारी वैजापूर संदीप निमसे यांनी कळिवले आहे. शिबीर कार्यालयाचे कामकाजाचे दिवस याप्रमाणे– गंगापूर १– महिन्यातील पहिला मंगळवार, लासूर– दुसरा मंगळवार, गंगापूर–२– तिसरा मंगळवार, शिवूर बंगला–चौथा मंगळवार, वाळूज– प्रत्येक शुक्रवार.

वेळापत्रकाप्रमाणे शिबिराच्या दिवशी शासकीय सुटी असल्यास त्या दिवसाचे नियोजन काम काजाच्या पुढच्या दिवशी करण्यात येईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. तरी नागरिकांनी शिबिर कार्यालयात लायसन्स, वाहन हस्तांतरण, नवीन वाहन नोंदणी, वाहन तपासणी, परवाने व इतर सेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# शवविच्छेदन प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर; अहवालांतील विलंबही कमी होणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) – राज्यातील शवविच्छेदन प्रक्रिया अधिक आधुनिक, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून, मुंबईत लवकरच नॉन–इन्वेसिव्ह पोस्टमॉर्टेम (शरीराला चिरफाड न करता शवविच्छेदन) तंत्रज्ञान सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील शवविच्छेदन अहवाल वेळेत उपलब्ध व्हावेत यासाठी शासनाने व्यापक उपाययोजना हाती घेतल्या असून, गेल्या दोन ते तीन वर्षांत प्रलंबित अहवालांची संख्या लक्षणीयरीत्या कमी करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सतेज पाटील, अंबादास दानवे, प्रज्ञा सातव, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात सध्या ५३३ शवविच्छेदन केंद्रांमधून कामकाज सुरू असून या वर्षात मे महिन्यापर्यंत १०,९०५ शवविच्छेदन प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या केंद्रांवरील कामाचा ताण लक्षात घेऊन कर्मचारी, पायाभूत सुविधा आणि इतर कमतरता यांचा आढावा घेऊन त्या समयबद्ध पद्धतीने दूर करण्यात येतील.

अत्याधुनिक नॉन–इन्वेसिव्ह पोस्टमॉर्टेम तंत्रज्ञानामुळे शरीराला चिरफाड न करता तपासणी करता येणार आहे. या तंत्रज्ञानामुळे वेळेची बचत, कमी मनुष्यबळाची गरज, मानवी चुका कमी होणे आणि अत्यंत सूक्ष्म बदलांचे अचूक निदान करणे शक्य होईल. मुंबईतील जे. जे. रुग्णालय व केईएम रुग्णालयात हे तंत्रज्ञान सुरू करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्रीची खरेदी प्रक्रिया आणि निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

पूर्वी शवविच्छेदन अहवाल मिळण्यासाठी सहा महिने ते वर्षभराचा कालावधी लागत असे. मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांत न्यायवैद्यक प्रयोगशाळांमधील कामकाज गतीमान करून प्रलंबित अहवालांची संख्या सुमारे तीन लाखांवरून ७५ हजारांपर्यंत कमी करण्यात आली आहे. पुढील तीन ते चार महिन्यांत ही प्रलंबित प्रकरणे नियमित पातळीवर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. मेडिको–लीगल स्वरूपाच्या प्रकरणांना आणि ज्या प्रकरणांमध्ये व्हिसेरा जतन करण्यात आला आहे, त्यांना प्राधान्य दिले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील काही शवविच्छेदन केंद्रांमध्ये नियमितपणे मृतदेह येत नसले, तरी अपघातप्रवण भागांतील केंद्रांवर मोठा ताण असतो. आवश्यक त्या ठिकाणी शीतगृहांची सुविधा उपलब्ध असून, सर्व शवविच्छेदन केंद्रांच्या सुविधांचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पोस्टमॉर्टेम प्रक्रियेतील माहिती गोपनीय ठेवणे हे नियमांनुसार बंधनकारक आहे.

शवविच्छेदन अहवाल पोलिसांकडे सादर होईपर्यंत कोणतीही माहिती सार्वजनिकपणे देणे चुकीचे आहे. अशा प्रकारचे नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

# राज्यातील सर्व सरकारी विभागांमधील बहुजनांसाठी राखीव जागा तात्काळ भरा!

## बसपचे माजी प्रदेशाध्यक्ष, बहुजन नेते ऍड.संदीप ताजने यांची मागणी

वाशिम / नागपूर, दि. ८ (प्रतिनिधी) – राज्यातील विविध शासकीय, निमशासकीय विभागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग प्रवर्गातील शेकडो पदे रिक्त आहेत. बहुजन समाजातील सुशिक्षत तरुण रोजगारासाठी वणवण फिरत असताना, हक्काच्या आरक्षित जागा वर्षांनुवर्षे रिक्त ठेवल्या जात असल्याबद्दल बहुजन समाज पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि बहुजन नेते ऍड.संदीप ताजने यांनी तीव्र संपात व्यक्त केला आहे. या सर्व जागा तात्काळ भरण्यासाठी सरकारने मेगा भरती प्रक्रिया सुरू करावी, अशी आग्रही मागणी करीत बहुजनांनी यासाठी एकत्रित येण्याचे आवाहन ऍड. ताजने यांनी केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार समोर आलेल्या माहितीनूसार नागपूर येथील विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रोद्योगिकी संस्थान अर्थात व्हीएनआयटी येथे प्राध्यापक व इतर संवर्गात मागासवर्गीयांच्या जागा मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याची आकडेवारी समोर आली आहे. आकडेवारीनूसार 'एससी'साठी नियमानुसार मंजूर ४८ जागांपैकी केवळ २८ जागा भरल्या गेल्या असून तब्बल २० जागा (४१.६७%) रिक्त आहेत. 'एसटी'साठी मंजूर २३ पैकी ९ जागा भरल्या असून १४ जागा (६०.८७%) रिक्त आहे.तर, 'ओबीसी'साठी ८९ जागांपैकी ४३३ जागा भरल्या असून ४६ जागा (५१.६९%) रिक्त आहेत.

केंद्रीय शैक्षणिक संस्था (शिक्षकांच्या केडरमधील आरक्षण) कायदा, २०१९ लागू झाल्यानंतरही राष्ट्रीय स्तरावरील आणि राज्यातील शैक्षणिक व प्रशासकीय संस्थांमध्ये मागासवर्गीयांचे प्रतिनिधित्व अत्यंत नगण्य ठेवले गेले आहे. व्हीएनआयटीसारख्या नामांकित संस्थेत जर अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींच्या ५० टक्क्यांहून अधिक जागा रिक्त असतील, तर राज्यातील इतर सरकारी विभागांची परिस्थिती याहून भयानक असल्याचे ऍड.ताजने म्हणाले.

राज्य शासनाच्या विविध ६५ हून अधिक विभागांमध्ये मागासवर्गीयांचा मोठा अनुशेष (इरलज्ञश्रेस) प्रलंबित आहे. यामुळे बहुजन समाजातील लाखो पात्र आणि गुणवंत उमेदवार वयोमर्यादा संपण्याच्या उंबरठ्यावर उभे आहेत. राज्यातील सर्व विभागांमधील SC, ST आणि मविशेष मोहिमेद्वारे भरण्यात यावा.कंत्राटी नोकरभरती बंद करून सर्व रिक्त जागांवर कायम स्वरूपी 'मेगा भरती' प्रक्रिया तात्काळ सुरू करावी आणि प्रत्येक विभागाची सुधारित 'बिंदू नामावली' सार्वजनिक करून पारदर्शक पद्धतीने परीक्षा घेण्यात याव्यात, अशी मागणी यानिमित्ताने ऍड.ताजने यांनी केली आहे.

# 'मुख्यमंत्री जनआरोग्य' शिबिरांना जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद!

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) – राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्ताने, संपूर्ण राज्यभर १ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'मुख्यमंत्री जनआरोग्य' शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री सचिवालयांतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष (मंत्रालय, मुंबई) यांचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबवले जात आहे. या अंतर्गत जिल्ह्यात आयोजित शिबिरांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. तुषार धामणे यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळिवली आहे.

जिल्ह्यात ४ जुलै २०२६ पासून या आरोग्य शिबिरांना सुरुवात करण्यात आली असून ६ जुलैपर्यंत एकूण १५ जनआरोग्य शिबिरे यशस्वीपणे पार पडली. या शिबिरांमध्ये तब्बल ४२७ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन व उपचारासाठी संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये गंभीर स्वरूपाच्या ७ रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले असून, त्यातील ४ बालकांवर 'राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम' अंतर्गत जिल्हा रुग्णालय येथे यशस्वी शस्त्रक्रिया देखील करण्यात आल्या आहेत.

या अभियानाचा एक विशेष उपक्रम म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, जनकल्याण रक्तपेढी आणि स्मित हॉस्पीटल (नंदुरबार) यांच्या संयुक्त समन्वयाने समशेरपूर कारखाना येथे विशेष रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला असून एकूण ६३ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. या सर्व शिबिरांमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजनांची सविस्तर माहिती देऊन नागरिकांमध्ये जनजागृती व जनप्रबोधन करण्यात आले. शासनाच्या या मोफत आरोग्यविषयक योजनांचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, आरोग्य विभाग जिल्हा परिषद, डी.पी. गावित आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय पथराई, धर्मादाय रुग्णालये, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना संलग्न रुग्णालयांचे संयुक्त सहकार्य लाभत आहे.

तसेच जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजय राठोड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनय सोनवणे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र सोनवणे यांच्या मोलाच्या सहकार्य लाभत असल्याचेही मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. धामणे यांनी या प्रसिद्धी पत्रकान्वये कळवले आहे.

# आपत्ती व्यवस्थापनातील घटकांचे कार्य मानवी हिताचे

**नैसर्गिक** आपत्ती ही केंव्हाही ओढवू शकते. निसर्गातील नैसर्गिक बदल क्षणोक्षणी बदलून मानव व प्राणी, पशु,पक्षी यांच्या जीवितास घातक ठरू शकतात.पावसाळ्यात नद्यांना व ओढ्यांना पूर येणे, डोंगर ढासळने, घरांची पडझड, वृक्ष उन्मळून पडणे,पुराच्या पाण्यात नागरिक अडकणे,गावात किंवा शहरात नद्यांच्या पुराचे पाणी शिरणे,घरांना पुराच्या पाण्याने वेढे देणे,अशा घरात नागरिक अडकणे,अशा कितीतरी घटना पावसाळ्यात घडतात.यामुळे वित्त हानी तर प्रचंड प्रमाणात होते, परंतु जीवित हानी ही मोठ्या प्रमाणात होते.अशा समयी आपत्ती व्यवस्थापन पथकाचे कार्य अत्यंत महत्वाचे असते.यात शासनाने विविध क्षेत्रात प्रवीण असणाऱ्या घटकांचा समावेश असतो. हे सर्व घटक अत्यंत चपळाईने जीवित हानी होऊ नये म्हणून कार्य करतात. पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित पणे बाहेर काढणे, पावसाने पडलेल्या घराच्या किंवा डोंगर, दऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या नागरिकांची सुटका करणे या साठी एनडीआरएफ चे जवान, पोलीस, होमगार्डस, मिलिटरी जवान सर्वच जिवाच्या पलीकडे प्रयत्न करून आपत्तीत सापडलेल्याची सही सलामत सुटका करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न आपत्ती व्यवस्थापन करते. दुर्दैवाने पुराच्या पाण्यात वाहून जाणाऱ्याचा शोध ही व्यवस्थापन करते.

आपत्ती व्यवस्थापनातील घटक अत्यंत चपळाईने व कार्य कुशलतेने पावसाळ्यातिल दिवसात कार्य करतात. शासनाचे महसूल खात्यातील कर्मचारी, आरोग्य खात्यातील आरोग्य सेवक,ग्रामीण भागातील पोलीस पाटील, ग्राम सेवक,तलाठी यांचेही या पावसाळ्याच्या चार महिन्यातील कार्य मानवी हित जपण्याचे असते. पावसाळ्यातील नैसर्गिक आपत्ती ओढवल्यास काही सेवा भावी संस्था ही आपद्ग्रस्तच्या मदती साठी धावून येतात. पावसाळ्याच्या चारही महिन्यात या आपत्ती व्यवस्थापनात कार्य करणाऱ्या सर्वांचे कार्य हे मानवी,पशु, प्राणी यांच्या हिताचे असते एव्हढे मात्र निश्चितच.त्यांच्या या जन हिताच्या कार्याला मनापासून दंडवत.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# राममंदिर देणगी घोटाळा प्रकरणी शिवसेनेचे 'रामरक्षा' आंदोलनास सुरुवात

## शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचे जगदगुरु श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांना निवेदन



छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – जगभरात राम भक्तांनी आपआपल्या परीने देणगी देऊन राममंदिर उभारणीसाठी हातभार लावला. कुणी रोख रक्कम तर कुणी वस्तू रुपात आणि सोन्या चांदीचे दागिने अर्पण केले. या भावनेची खिल्ली उडवून राम मंदिरात मोठा घोटाळा समोर आला. अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरात हजारो कोटींचा घोटाळा झाला असून, यामुळे रामभक्त संतप्त झाले आहेत. यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी 'रामरक्षा' आंदोलनाची घोषणा केली. यानिमित्त शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचे जगद्गुरू श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांना निवेदन दिले. देणग्यांमधील घोटाळा, चोरी, गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी शिवसेनेच्या वतीने साधुसंत यांना निवेदन देण्यात येणार आहे. तसेच राममंदिर, हनुमान मंदिरांसमोर रामरक्षा आंदोलन करण्यात येणार असल्याचे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी जाहीर केले. याप्रसंगी माजी महापौर सुदाम सोनवणे, शिक्षक सेनेचे पद्माकर इंगळे, महिला आघाडीच्या सुनीता देव, अनिता मंत्री, आशा दातार, सुकन्या भोसले, मीरा देशपांडे, कांता फसाटे आदी उपस्थित होते.

# कर्जमुक्ती आणि प्रोत्साहनपर लाभासाठी 'अ‍ॅग्रीस्टॅक' नोंदणी बंधनकारक

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) – राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना आता आधार कार्ड आणि अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या क्रमांकाशिवाय कर्जमाफी किंवा प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळणार नाही. तरी बीड जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी ही नोंदणी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज, जे ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत होते आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नाही, अशा शेतकऱ्यांना लाभ मिळेल. जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता, एका किंवा अनेक बँकांमधील मिळून जास्तीत जास्त २ लाख रुपयांपर्यंतची मुद्दल व व्याजासह थकबाकी थेट कर्ज खात्यात जमा करून शेतकरी कर्जमुक्त केले जातील. तसेच ज्या नियमित कर्जदार शेतकऱ्यांनी २०२२–२३, २०२३–२४ आणि २०२४–२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची उचल करून वेळेत परतफेड केली आहे, त्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी प्रथम आपला आधार कार्ड क्रमांक मोबाईल नंबरशी लिंक करणे आवश्यक आहे. आधार लिंक झाल्यानंतर अ‍ॅग्रीस्टॅक पोर्टलवर जाऊन आपली नोंदणी पूर्ण करावी. नोंदणीनंतर मिळणारा अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आपल्या पीक कर्ज खाते असलेल्या बँकेत जमा करावा. ज्या शेतकऱ्यांकडे आधीपासूनच हा नोंदणी क्रमांक उपलब्ध आहे, परंतु त्यांनी तो अद्याप बँकेत जमा केलेला नाही, त्यांनीही तो त्वरित बँकेकडे सुपूर्द करावा. या क्रमांकाशिवाय कोणत्याही परिस्थितीत योजनेचा लाभ खात्यात जमा होणार नसल्याने शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. असेही जिल्हा उपनिबंधक, बीड यांनी कळविले आहे.

# छत्रपती संभाजीनगरात खासगी आस्थापनांना सीसीटिव्ही बंधनकारक; पोलीस आयुक्तांची अधिसूचना जारी

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी यापुर्वीच 'एक कॅमेरा शहरासाठी–सर्वांच्या –सुरक्षेसाठी' हा उपक्रम सुरु केलेला असुन त्याचा मुख्य उद्देश शहरातील गुन्हेगारी उघडकीस आणने, गुन्हेगारींना आळा घालणे, महिला व बालकांची सुरक्षा वाढवणे हा आहे. त्याअनुषंगाने मा. पोलीस आयुक्त श्री प्रवीण पवार यांनी शहरवासीयांचे सुरक्षिततेसाठी पुन्हा एक महत्वपूर्ण अधिसूचना जारी केली आहे. सदर अधिसुचना जारी करण्याचा महत्वपुर्ण उद्देश छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी तसेच खासगी आस्थापनांच्या परिसरात गुन्ह्यांच्या घटना घडत असल्याचे निर्दशनास आले आहे, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊन



सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग होत आहे. सार्वजनिक ठिकाणी व खाजगी आस्थापना परिसरातील गुन्ह्यांना प्रतिबंध करणे, असे घडलेल्या गुन्ह्यांचा तपास करणे, असे घडलेले गुन्हे उघडकीस आणने आणि अशा गुन्ह्यातील गुन्हेगारांना न्यायालयासमोर उभे करण्यासाठी वैज्ञानिक पुरावे गोळा करणे असा आहे. भविष्यातील अशा गुन्ह्यातील आरोपीवुरुध्द भक्कम पुरावे उभा करणे, त्यांना शिक्षा व्हावी या दृष्टीने असे वैज्ञानिक पुराव्याचा वापर करणे हा महत्वपुर्ण उद्देश मा. पोलीस आयुक्त सरांचे या अधिसुचना जारी करणे मागे आहे.

पोलीस आयुक्त श्री. प्रविण पवार यांचे असे निदर्शनास आले की, शहरातील खाजगी आस्थापनाच्या बाहेरील परिसरात अनेक घटना घडतात व वैयक्तीक पुरव्याच्या अभावामुळे त्या उघडकीस येत नाही, हे पोलीस आयुक्त श्री. प्रविण पवार यांचे निदर्शनास आल्याने शहरातील 'खाजगी आस्थापना' येथे CCTV बसविणे व ज्या ठिकाणी उउढत यापुर्वीच बसविले आहे त्या ठिकाणाची कॅमेऱ्यांची दिशा व दृश्य क्षेत्र, कॅमेऱ्यांची गुणवत्ता, रेकॉर्डिंग क्षमता या संदर्भाने शहरातील 'खाजगी आस्थापना' करीता अधिसुचना जारी केली आहे.

सदर अधिसुचनेचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

*ग्रामीण आवास योजनेचा आढावा*

# लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा,मोफत वाळू उपलब्ध करून द्या-जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी



छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- ग्रामीण आवास योजनेतील लाभार्थ्यांना हक्काचे घरकुल मिळवून देण्यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणेने गतीने घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्याबरोबरच अतिक्रमण झालेल्या जमिनीवरील घरे नियमानुकूल करणे आणि घरकुल बांधकामासाठी पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्याचे प्रस्ताव तातडीने जिल्हा प्रशासनाकडे सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी महसूल व ग्रामविकास विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल आणि जिल्हा परिषद प्रशासनाची संयुक्त आढावा बैठक जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी.एम, जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभागाचे सभापती, बालाजी सोनटक्के, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणाचे वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि नगरपालिका मुख्याधिकारी उपस्थित होते.

ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जागेचे प्रस्ताव तातडीने मंजूर करून लाभार्थ्यांची यादी, जागा, आराखडा आणि संबंधित कागदपत्रे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावीत. जेणेकरून घरकुल मंजुरीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करता येईल.

शासकीय किंवा गायरान जमिनीवरील लाभार्थ्यांच्या घरांबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करून ती नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव सादर करावेत. वनविभागाच्या अखत्यारितील जमिनींसाठी आवश्यक परवानग्या तातडीने मिळवून प्रक्रिया गतीमान करावी,तसेच याबाबतचे परवानगीचे पत्र वन विभागांनी तात्काळ जिल्हा प्रशासनास सादर करावेत. असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले.

घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी पाच ब्रास वाळू मोफत मिळावी, यासाठी लाभार्थ्यांच्या घरापासून जवळ अंतरावर असलेल्या शासकीय वाळू डेपोतून ही वाळू उपलब्ध करून देण्याची कार्यवाही महसूल आणि ग्रामविकास विभागाने समन्वयाने करून येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात.

शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांच्या प्रस्तावातील त्रुटी मुख्याधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांनी तत्काळ दूर करून लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करण्यासाठीचे प्रस्ताव सादर करण्यात यावेत.याबाबत जिल्ह्यातील आवास योजनांच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी मोहीम स्वरूपात सर्व यंत्रणेने सहभाग घ्यावा असे जिल्हाधिकारी यांनी सुचित केले.

जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी, ग्रामीण भागातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांना घरकुल मिळावे यासाठी जिल्हा प्रशासन आणि ग्रामविकास विभागाने परस्पर समन्वयाने काम करून प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करावी, गोर गरिबांना हक्काचा निवारा देण्यात लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी मिळून काम करण्याचे आश्वासन बैठकीत दिले .

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी. एम. यांनी, जिल्ह्यातील 'नशामुक्त अभियान',बाल विवाह मुक्त संभाजीनगर' आणि 'कुपोषणमुक्त बालक' यासाठी पोलीस, उत्पादन शुल्क विभाग महिला बाल विकास, महसूल आणि ग्रामविकास विभागाने या महत्त्वाकांक्षी उपक्रमांमध्ये सहभागी होऊन ते यशस्वी करण्यात पुढाकार घ्यावा असे आवाहन यंत्रणेला केले.

गंगापूर आणि वैजापूर तालुक्यातील घरकुलासाठी मंजूर झालेल्या गायरान जमीन ग्रामपंचायसाठी देण्यात आली असल्याचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी. एम. यांच्याकडे सुपूर्द केले .

## विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य; जैन टॅग ग्रुपचा मोफत जादू प्रयोग उपक्रम गाजला



छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनीधी)- नवजीवन स्कूल व पी. यू. जैन स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी आगळावेगळा उपक्रम सामाजिक उत्तरदायित्व जपत जैन ग्रुप तर्फे नवजीवन स्कूल व पी. यू. जैन स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत जादू प्रयोग आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व शाळा प्रशासनाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धपणे कार्यक्रमाचा आनंद घेतला आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व उत्साहाने संपूर्ण वातावरण भारावून गेले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जैन टॅग ग्रुपच्या अध्यक्षा जयश्री लोहाडे यांच्या नेतृत्वाखाली प्रोजेक्ट कमिटी, रचना पहाडेकीर्ती पाटनी मिताली काला सारीका बडजाते दिपाली पाडे सपना पाटनी कोअर कमिटी अणुपमा दगडा दिपीका बडजाते आणि ग्रुपच्या सर्व २५ सदस्यांनी मोलाचे योगदान दिले.

जैन टॅग ग्रुपतर्फे दोन्ही शाळांचे संस्थापक, विश्वस्त, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी आणि सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## विशेष पुनरिक्षण प्रक्रियेत राजकीय पक्षांच्या बुथ प्रतिनिधींनी सहयोग द्यावा- जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.



छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचे कामकाज सुरु आहे. या कामात मतदान केंद्रस्तरावर काम करणाऱ्या बुथ प्रतिनिधींनी सहयोग द्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. मनपाचे अपर आयुक्त रणजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सविता चौधर, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड आदी उपस्थित होते. तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा यांनी आवाहन केले की, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या आता घरोघरी भेटी सुरु आहेत. तेथे मतदारांना पडताळणी अर्ज भरुन घेतला जात आहे.

त्यासाठी राजकीय पक्षाने नियुक्त केलेल्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी आपल्या स्थानिक संपर्काचा वापर करुन फॉर्म मतदारांकडून भरुन घ्यावे व जमा करावे. यासाठी सर्व राजकीय पक्षांनी सगळीकडे आपले बुथ प्रतिनिधी नियुक्त करावे व या कामात सहयोग द्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी गौडा यांनी केले.


## मुलींच्या बालगृहाच्या प्रस्तावास गती द्या; आमदार सतीश चव्हाण यांची विधान परिषदेत मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- पैठण येथील शासकीय मुलींच्या बालगृहाची पुनर्बांधणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा महिला बाल विकास विभागाने ३६ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला असून या बालगृहाच्या प्रस्तावास तातडीने गती द्यावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी आज (०८) विशेष उल्लेखाव्दारे विधान परिषदेत केली.

पैठण येथे जवळपास ५ एकर जागेत ६५ वर्षांपूर्वी बांधकाम झालेल्या इमारतीत मुलींचे बालगृह आहे. सदरील इमारतीचे आयुष्य संपले असल्याने मुलींची सुरक्षितता म्हणून कोणताही संभाव्य धोका न पत्करता सार्वजनिक बांधकाम विभागाने या इमारतीला धोकादायक घोषित करून तसे पत्र महिला व बालविकास विभागाला सन २०२२ मध्येच दिले. या ठिकाणी नवीन इमारत आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधकाम करण्यासाठी ३६ कोटींचा नवीन प्रस्ताव जिल्हा महिला बालविकास विभागाने दोन वर्षापूर्वीच शासनाकडे पाठवला आहे. मात्र यासंदर्भात शासनस्तरावर अद्यापही काहीच कार्यवाही झाली नसल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

सदरील बालगृहाची तातडीने पुनर्बांधणी करणे आवश्यक असून यासंदर्भात आवश्यक तो निधी त्वरित उपलब्ध करून द्यावा अशी आग्रही मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात केली.

## वेरूळ लेणीच्या सौंदर्यात भर; सहा महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर लेणी क्र. २९ वरील धबधबा प्रवाहित



वेरूळ दि.८ (प्रतिनिधी)- जागतिक वारसा स्थळ असलेल्या वेरूळ लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी आनंदाची बातमी आहे. सहा महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर लेणी क्रमांक २९ वरील नैसर्गिक धबधबा पुन्हा जोरदारपणे प्रवाहित झाला आहे. परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे धबधबा सुरू झाल्याने लेणींचे सौंदर्य अधिकच खुलले आहे.

पावसाळ्यात डोंगररांगांमधून साचलेले पाणी लेणी क्रमांक २९ वरील जोगेश्वरी समोरील असलेले कुंडातून पाणी भरून व कुंडच्या वरून पाणी प्रवाहने वाहू लागते व त्यामुळे हा धबधबा कोसळते आणि त्यामुळे दगडी कलाकृतींना पाण्याची नजाकत मिळते. कैलास मंदिरासोबतच हा धबधबा पर्यटकांचे खास आकर्षण ठरतो. धबधबा सुरू होताच परिसरातील वातावरण आल्हाददायक झाले असून येत्या शनिवार-रविवारी पर्यटकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

## झाडीपट्टी, नमन, जाखडी आणि वही गायन लोककलांचाही अनुदान योजनेत समावेश; दशावतारासह लोककला अनुदान दुप्पट, अनुदान थेट खात्यावर जमा होणार

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- विद्यमान लोककला अनुदान योजनेत नमन खेळ, जाखडी, वही गायन आणि झाडीपट्टी या चार लोककला प्रकारांचाही समावेश करण्यात येणार आहे. या प्रत्येक लोककला प्रकारातील २० कलापथकांना प्रत्येकी ५० हजार रुपये याप्रमाणे वार्षिक १० लाख रुपयांचे अनुदान देण्यात येईल. राज्यातील दशावतार ही केवळ लोककला नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि पारंपरिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. या कलेचे जतन व संवर्धन करण्यासाठी दशावतारासह लोककला अनुदानाची रक्कम २ कोटी २२ लाख रुपयांवरून ४ कोटी ४० लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला असून कलाकारांना थेट त्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा करण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना केली.

विधानसभा सदस्य निलेश राणे यांनी दशावतारी कलाकारांच्या विविध समस्यांसंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली असता मंत्री ॲड.शेलार यांनी ही घोषणा केली. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव, सुनील प्रभू यांनीही सहभाग घेतला.

कोकणातील दशावतार कलेने राज्यासह देश-विदेशात महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख निर्माण केली आहे. या कलेसाठी कार्यरत असलेल्या कलाकारांच्या विविध मागण्यांबाबत बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीत राज्यस्तरीय समितीचा विस्तार करण्यात आला असून देवेंद्र नाईक, दत्ताप्रसाद शेणई, संतोष रेडकर, राजाराम धुरी आणि शरद मोचेमाडकर यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे, असे शेलार म्हणाले.

१ जानेवारी २००८ च्या शासन निर्णयानुसार पूर्णवेळ तमाशा, हंगामी तमाशा, दशावतार, खडी गंमत तसेच शाहिरी व संगीत बारी या लोककलांना भांडवली व प्रयोगात्मक अनुदान दिले जाते. मात्र अनुदानाचा लाभ कलाकारांपर्यंत थेट पोहोचावा, यासाठी नव्या निर्णयानुसार वाढीव निधीपैकी निम्मी रक्कम कलाकारांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल, तर उर्वरित रक्कम कलापथक चालकांना देण्यात येईल. यासंदर्भातील शासन निर्णय पुढील १५ दिवसांत निर्गमित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दशावतार कलाकारांची नोंदणी, जिल्हास्तरावर प्रत्यक्ष पडताळणी तसेच लोककलावंतांना ओळखपत्र देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. यासाठी विभागीय अधिकारी जिल्हास्तरावर जाऊन नोंदणी प्रक्रिया राबवतील, असे त्यांनी सांगितले.

दशावतार महोत्सव, नमन महोत्सव तसेच राज्य सांस्कृतिक पुरस्कार योजनेंतर्गत दशावतार कलेसाठी तीन लाख रुपयांचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार आणि एक लाख रुपयांचा राज्य सांस्कृतिक युवा पुरस्कार देण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. राज्यातील भारूड, शंकासूर आणि शक्तीतुरा या लोककलांचे महोत्सव राज्यातील प्रत्येक विभागात आयोजित करण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. तसेच कोकणासह राज्यातील भजनी मंडळांना भांडवली साहित्य खरेदीसाठी सुरू असलेली अनुदान योजना अधिक व्यापक करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. 'देव खेळ' या वेब सिरीजमध्ये लोकपरंपरेचा विपर्यास झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित वेब सिरीजविरोधात पोलिस कारवाई करण्याचे तसेच केंद्र शासनालाही याबाबत कळविण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती ॲड.शेलार यांनी दिली. याशिवाय, राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलाकार मानधन योजनेत पात्र दशावतार कलाकारांचा समावेश करण्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांमार्फत कार्यवाही करण्यात येईल. भजनी कलाकारांच्या विविध मागण्यांबाबत स्वतंत्र बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल, असेही शेलार यांनी सांगितले.

## (पान १ वरुन)

### गोकुळाष्टमीच्या कार्यक्रमात...

मान्यवर उपस्थित असतानाही अशा प्रकारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते, अशी खंत कायंदे यांनी व्यक्त केली.

अनेक कार्यक्रम इतके अशोभनीय स्वरूपाचे असतात की त्या कार्यक्रमांना उपस्थित राहणेही कठीण होते. स्वतःला अनेकदा कार्यक्रम अर्धवट सोडून बाहेर पडावे लागल्याचा अनुभव त्यांनी सभागृहात सांगितला. अशा कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

डान्सबार आणि ऑर्केस्ट्रामध्ये काम करणाऱ्या महिलांना कामगार म्हणून कायदेशीर मान्यता देण्यात यावी, त्यांना ओळखपत्रे देण्यात यावीत तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण कामगार कायद्यांतर्गत करण्यात यावे, अशी मागणी चित्रा वाघ यांनी केली. या महिलांवर अन्याय, छळ किंवा शोषण झाल्यास तक्रार नेमकी कुठे करायची, याची कोणतीही प्रभावी यंत्रणा सध्या उपलब्ध नसल्याचे त्यांनी नमूद केले.

### अशैक्षणिक कामे, टीईटी...

हे आंदोलन होत आहे. या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेसह विविध शिक्षक संघटनांनी पाठिंबा जाहीर केला आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेनेही आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. कार्यरत शिक्षकांवरील टीईटीची सक्ती, पदोन्नतीतील अन्याय, संचमान्यता धोरण आणि बीएलओ-एसआयआरसारख्या अशैक्षणिक कामांविरोधातील हा लढा आहे. राज्यातील सर्व शिक्षकांनी यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षक सेनेचे अध्यक्ष आमदार ज. मो. महाजन यांनी केले आहे.

### ख्रिश्चन मिशनरीच्या मालमत्तांची...

यांच्यातील वादग्रस्त मालमत्ता प्रकरण न्यायप्रविष्ट असले तरी संबंधित मालकी नोंदी, व्यवहारांची वैधता, धर्मादाय आयुक्त कार्यालयातील नोंदी तसेच इतर संबंधित बाबींची चौकशी करण्यात येणार आहे. चौकशी अहवालाच्या आधारे आवश्यक ती भूमिका उच्च न्यायालयात मांडण्यात येईल.

संबंधित मालमत्तांशी निगडित नागरिकांच्या तक्रारी, खासगी संस्थांकडून होणारा कथित त्रास आणि नोंदींमधील संभाव्य अनियमिततांचीही तपासणी करण्यात येईल. चौकशीअंती आवश्यक ती कायदेशीर व प्रशासकीय कार्यवाही करून नागरिकांचे हित संरक्षित करण्यात येईल, असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

### महाराष्ट्रात व्यवहारिक मराठी...

विरोधात नसून कोट्यवधी प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी, सुलभ संवादासाठी आणि ग्राहकाभिमुख सार्वजनिक सेवा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे. चालक आणि प्रवासी यांच्यातील स्पष्ट संवादामुळे गैरसमज कमी होतील, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळेल आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थे वरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी परिवहन विभागाने मागील काही महिन्यांपासून राज्यव्यापी प्रशिक्षण मोहीम राबविली आहे.

कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाचा मराठी भाषा विभाग यांच्या सहकार्याने हजारो अनुभवी शिक्षकांची फळी तयार करण्यात आली. राज्यभरातील विविध प्रादेशिक परिवहन कार्यालये, प्रशिक्षण केंद्रे तसेच चालकांच्या सोयीच्या वेळेनुसार व्यवहारिक मराठीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

या प्रशिक्षणासाठी दैनंदिन सेवेत उपयुक्त ठरणारी वाक्यरचना, प्रवाशांशी नम्र संवाद, दिशा, ठिकाणे, भाडे, आपत्कालीन प्रसंग तसेच महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांशी प्रभावी संवाद साधण्यासाठी विशेष अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. सोप्या पुस्तिका, संवाद माला आणि प्रशिक्षण साहित्याच्या माध्यमातून मराठी शिकणे सहज, सोपे आणि आनंददायी व्हावे, यावर विशेष भर देण्यात आला आहे.

### मिसिंग लिंक इंजिनिअरिंग...

लिंकवरुन टीका करणाऱ्यांचा चांगलाच समाचार घेतला. ज्यांना कुत्रा नाही विचारत, ते आज सोशल मीडियावर येऊन सगळ्यांना शिव्या देत आहेत. असे भाड्याचे तट्टू मिसिंग लिंकबाबत पैसे घेऊन सोशल मीडियावर लिहत होते. या सगळ्यांना मी एकच सांगतो की, महाराष्ट्राचा अपमान कराल तर मी सोडणार नाही, असे देवेंद्र फडणवीसांनी ठणकावून सांगितले. मिसिंग लिंकवर दरड कोसळण्याच्या घटनेने आपण काही गोष्टी शिकलो. पाण्याचा प्रवाह कसा बदलू शकतो, दर कशी कोसळू शकते, हे आपल्याला लक्षात आले. त्यामुळे आता आपण आयआयटीमधील तज्ज्ञांचा सल्ला घेऊन नव्या उपाययोजना करणार आहोत. जेणेकरुन कदाचित पुढच्यावर्षी अशी घटना घडणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

महायुती सरकारमध्ये हिंमत होती म्हणून आम्ही कनेक्टिंग लिंक बांधून दाखवली. कोकण रेल्वेही तशीच सुरु केली. तेव्हाही ही रेल्वे चालू शकणार नाही, असे म्हटले जायचे. मात्र, मधू दंडवते नावाच्या माणसाने हिंमत दाखवून कोकण रेल्वे सुरु केली. त्यानंतर सतत १५ वर्षे पावसाळ्यात कोकण रेल्वे मार्गावर दरड कोसळत होती. आपण प्रत्येकवेळी शिकायचो आणि काम करायचो. त्यावेळी घाबरुन कोकण रेल्वे सुरुच केली नसती तर आज काय अवस्था असती? मिसिंग लिंकचा इतिहासही असाच आहे. आघाडी सरकारमध्ये मिसिंग लिंकचा प्रस्ताव तयार झाला. तेव्हाच्या मुख्यमंत्र्यांनी २ पानी पत्र लिहून १४ कारणं देऊन, मिसिंग लिंक होऊ शकत नाही, असे सांगून ती फाईल बंद केली. मात्र, आम्ही अधिकाऱ्यांशी आणि तज्ज्ञांशी बोललो, त्यांनी मिसिंग लिंक उभारणे शक्य असल्याचे सांगितले.

### महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर...

सीमा प्रश्नावरील सर्वोच्च न्यायालयातील लढाई अधिक प्रभावीपणे लढण्याबाबत चर्चा झाली. राज्य सरकारने हा खटला अधिक ताकदीने मांडण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीत बेळगाव, कारवार, निपाणीसह मराठीबहुल भाग संयुक्त महाराष्ट्रात यावेत, ही महाराष्ट्राची भूमिका कायम ठेवण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्याने राज्याची कायदेशीर बाजू आणखी मजबूत करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, ऐतिहासिक पुरावे आणि पुढील रणनीती यावरही चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावर शरद पवार यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीपासून सातत्याने भूमिका घेतली आहे. मराठी भाषिक भाग महाराष्ट्रात यावेत, या मागणीसाठी त्यांनी अनेकदा आवाज उठवला आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या बैठकीत त्यांची उपस्थिती विशेष मानली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १९९६ नंतर प्रथमच अधिवेशन काळात ते विधानभवनात आले. बैठकीत जवळपास अर्धा तास विविध मुद्द्यांवर चर्चा झाली आणि सीमावादाच्या न्यायालयीन लढाईला अधिक गती देण्यावर सर्वपक्षीय नेत्यांमध्ये एकमत झाले.

### विजेचा धक्का लागून एकाच...

दोन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. मृतांची नावे किसोरडे शिंदे, सचिन शिंदे, गगाया शिंदे आणि अर्चना शिंदे अशी आहेत. घटनेची माहिती मिळताच फलटण पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. महावितरणच्या कारभारावर आणि सुरक्षेवर आता स्थानिक पातळीवरून मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.


दैनिक लोकविजय

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM
**OLD NAME -** AKASHARA DINESH BABTE
TO
**NEW NAME -** AKSHARA DINESH BABTE
**ADDRESS -** PRIYADARSHINI, PLOT NO 39, SECTOR-G, N-5 CIDCO, AURANGABAD PIN:431003, MAHARASHTRA, INDIA